| **Publication** – Divya Marathi | **Page No** - 08 |
|---|---|

संधी | मुंबई येथे होणार प्रदर्शन; शहरातील रबर उत्पादकांना आवाहन

# आशियातील सर्वात मोठ्या रबर प्रदर्शनासाठी नाशकात रोड शो

प्रतिनिधी | नाशिक

इंडिया रबर एक्सपो (आयआरइ) हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्स्पो या महिन्यात १७ ते १९ जूनदरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे. हे प्रदर्शन रबर उद्योगाचा विकास, आदान-प्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. या प्रदर्शनाचे आयोजन ऑल इंडिया रबर इंडस्ट्रीज असोसिएशनकडून करण्यात आले असून, रबर उद्योगाच्या विकासासाठी व व्यवसायवृद्धीसाठी हे प्रदर्शन लाभदायी ठरणार असल्याचे 'आयआरइ २०१९'चे अध्यक्ष विक्रम मकर यांनी सांगितले. या प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर नाशकात रोड शोद्वारे रबर उत्पादकांना आवाहन करण्यात येत आहे.

ऑल इंडिया रबर इंडस्ट्रीज असोसिएशनची स्थापना भारतीय रबर उद्योगाचे संरक्षण करणे आणि त्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने झाली होती. आज ही संस्था १२०० पेक्षा अधिक सक्रिय सभासदांसोबत विस्तीर्ण संबंधांसह उद्योगाचा आवाज बनली आहे. या प्रदर्शनात १०० पेक्षा जास्त विदेशी कंपन्या या भारतीय रबर उत्पादकांसोबत बिझनेस टू बिझनेस मिट करणार असून, त्यातून व्यवसायाची मोठी देवाण-घेवाण होऊ शकणार असल्याचे प्रदर्शनाचे समन्वयक विष्णू भीमराजका यांनी सांगितले. आयआरइ भारतातील १५ शहरांमध्ये इंडिया रबर एक्स्पो २०१९ ला प्रोत्साहन देण्यासाठी रोड शोचे आयोजन करत आहे. हा रोड शो अहमदाबादपासून सुरू होऊन देशातील १५ शहरांमध्ये फिरून जागरूकता निर्माण करणार आहे आणि इंडिया रबर एक्सपो २०१९ मध्ये अधिकाधिक लोकांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी विनोद बन्सल, उमेश ध्रुव, नाशिकचे पटेल आदी उपस्थित होते.

### नाशिकमध्ये चाळीसवर रबर कंपन्या

**नाशिक-सिन्नर या परिसरात चाळीसपेक्षा जास्त छोट्या-मोठ्या रबर कंपन्या कार्यरत असून, त्यांनादेखील हे प्रदर्शन विशेष लाभदायी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जातोय. यामुळे पहिल्यांदाच नाशिकमध्ये असा रोड शो आयोजित करण्यात येत आहे.**